# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेत प्रकल्प विभागांतर्गत विविध विकास
**{सा.प्र.वि}** कामे / प्रकल्प राबविण्यात येत आहेत. सदर प्रकल्पासंबंधातील अनुषंगीक कार्यवाही करणे, प्रकल्प विहीत वेळेत पूर्ण करणे, इत्यादी आवश्यक कामास्तव जाहिरात क्र. ९०१/पी.आर., दि. १८/०१/२०२४ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात आलेल्या खालील सेवानिवृत्त उमेदवारांना करार / कंत्राट पद्धतीवर शासन निर्णय दि. १७ डिसेंबर,२०१६ मधील व शासन निर्णय ८ सप्टेंबर, २०२३ मध्ये झालेल्या दुरूस्त तरतुदीनुसार, करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याकरीता कार्यालयीन आदेश क्र. २७२/ओ.ॲन्ड.एम. ,दि. ०५/०३/२०२४ अन्वये चार "कंत्राटी सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य)" म्हणून नियुक्ती करण्यात आलेले आहे. त्यानंतर मनपा प्रशासक ठराव क्र. ९९७, दि.२९/०८/२०२४ नुसार दिलेल्या मंजुरीनुसार कार्यालयीन आदेश क्र. २७२/ओ.ॲन्ड.एम., दि. ०९/०९/२०२४ अन्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. ०५/०३/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे चार "कंत्राटी सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य)" यांच्या सेवेची प्रकल्प विभागाला आवश्यकता असल्यामुळे, तांत्रिक खंड देऊन दि. ०७/०३/२०२५ पासून पुढील ६ महिन्याकरीता (दि. ०६/०९/२०२५) पर्यंत मुदतवाढ देण्याचा व याकरीता अंदाजे रू. १९,११,३१२/- इतका खर्च येणार असून, प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी.

टिप :- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 1246/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 11/02/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेत प्रकल्प विभागांतर्गत विविध विकास कामे / प्रकल्प राबविण्यात येत आहेत. सदर प्रकल्पासंबंधातील अनुषंगीक कार्यवाही करणे, प्रकल्प विहीत वेळेत पूर्ण करणे, इत्यादी आवश्यक कामास्तव जाहिरात क्र. ९०१/पी.आर., दि. १८/०१/२०२४ च्या

अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात आलेल्या खालील सेवानिवृत्त उमेदवारांना करार / कंत्राट पद्धतीवर शासन निर्णय दि. १७ डिसेंबर,२०१६ मधील व शासन निर्णय ८ सप्टेंबर, २०२३ मध्ये झालेल्या दुरूस्त तरतुदीनुसार, करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याकरीता कार्यालयीन आदेश क्र. २७२/ओ.ॲन्ड.एम. ,दि. ०५/०३/२०२४ अन्वये चार "कंत्राटी सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य)" म्हणून नियुक्ती करण्यात आलेले आहे. त्यानंतर मनपा प्रशासक ठराव क्र. ९९७, दि.२९/०८/२०२४ नुसार दिलेल्या मंजुरीनुसार कार्यालयीन आदेश क्र. २७२/ओ.ॲन्ड.एम., दि. ०९/०९/२०२४ अन्वये त्यांचा नियुक्ती कालावधी दि. ०५/०३/२०२५ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे चार "कंत्राटी सेवानिवृत्त उपअभियंता (स्थापत्य)" यांच्या सेवेची प्रकल्प विभागाला आवश्यकता असल्यामुळे, तांत्रिक खंड देऊन दि. ०७/०३/२०२५ पासून पुढील ६ महिन्याकरीता (दि. ०६/०९/२०२५) पर्यंत मुदतवाढ देण्याचा व याकरीता अंदाजे रू. १९,११,३१२/- इतका खर्च येणार असून प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.